महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग, जि. रायगड.**
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड

Email- deangmcalibag@gmail.com | Phone No. 02141-299214 | www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/आस्थापना-राजप/विनंम / जाहिरात/७८० /२०२५ | दिनांक.११/०३/२०२५

## : जाहिरात (Walk-In-Interview):

विषय :- सहाय्यक प्राध्यापक(वर्ग-२) व वरिष्ट निवासी या संवर्गातील रिक्त असलेली पदे कंत्राटी ३६४/१२० दिवसांकरीता कंत्राटी स्वरुपाने एकत्रित मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारसीनुसार भरण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शा.नि. क्रं. एमईडी - २०१०/प्र.क्रं.७६ (अ)/२०१०/ शिक्षण - १,मंत्रालय, मुंबई दि ३१.०१.२०१२.
२. महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शा.नि.क्रं. पदनि - २०२२/ प्र. क्रं. १०८/२०२०/वैसेवि - २,दिनांक २९.०१.२०२१
३. शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्रं.क्र.३१/१६-अ,दिनांक ३१.०५.२०२१.
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९/आस्था दिनांक १४.०६.२०२१.
५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी-२०२१/प्र.क्रं.३८७/१६-ब(ए),दिनांक ०६.०७.२०२१.
६. मा. संचालक यांचे पत्र DMER-११०२०/८/२०२३-CETIT,दि.०७/१०/२०२३.
७. शासन निर्णय क्रमांक. एलईसी - १४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३,दि.१८ जुलै, २०२४.
८.महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शा. नि. क्रं. एमईडी-२०१०/प्र.क्र. ७६ (अ)/२०१०/ शिक्षण-१, मंत्रालय, मुंबई दि. ३१.०१.२०१२

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड या संस्थेतील खालील नमुद विषयातील सहाय्यक प्राध्यापक व वरिष्ट निवासी पदाचे अर्ज स्विकृत करुन पात्र उमेदवारांचे अर्ज मा. अधिष्ठाता यांना संदर्भ क्र. ७ नुसार दिलेल्या प्राधिकारानुसार सदर मुलाखतीची तारीख मा. अध्यक्ष, वि. नि. मं. व मा. अधिष्ठाता, शा.वै.म.अलिबाग-रायगड यांच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सहाय्यक प्राध्यापक ही पदे ३६४ दिवसाकरिता व वरिष्ट निवासी हे १२० दिवसाकरिता संस्थेतील सदर संवर्गातील रिक्त पदे शासनाकडुन सरळसेवा भरतीव्दारे किंवा बदलीव्दारे नियमित उमेदवार उपलब्ध होई पर्यंत किंवा संचालनालयातर्फे बंधपत्रित उमेदवार मिळे पर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळामार्फत उपरोक्त विहीत कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात प्रचलित नियमानुसार एकत्रित मानधन तत्वावर भरण्याकरिता संस्थेच वेबसाईट व सुचनाफलकावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. मुलाखत दिनांक २५/०३/२०२५ रोजी दुपारी ११.०० वाजता व पुढील ३० दिवस दररोज थेट मुलाखतीने भरण्यात येणार आहे. या ३० दिवसात उपलब्ध संबंधीत विभागाची सर्व रिक्त पदे भरल्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. पात्र उमेदवानांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह थेट मुलाखतीकरिता स्वर्चाने उपस्थित राहावे, तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडुन ना-अरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

## रिक्त पदांचा तपशिल.

| अ.क्र | विभागाचे नाव | सहाय्यक प्राध्यापक रिक्त पदांची संख्या | वरिष्ट निवासी रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | शरीररचनाशास्त्र | ०१ | ०२ |
| ०२ | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | ०२ |
| ०३ | जीवरसायन शास्त्र | ०० | ०२ |
| ०४ | शरीरविकृतीशास्त्र | ०१ | ०२ |
| ०५ | सूक्ष्मजीवशास्त्र | ०० | ०२ |
| ०६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | ०० |
| ०७ | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०२ | ०२ |
| ०८ | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | ०४ |
| ०९ | बालरोगचिकित्साशास्त्र | ०२ | ०२ |
| १० | मनोविकृतीशास्त्र | ०१ | ०१ |
| ११ | शल्यचिकित्साशास्त्र | ०२ | ०४ |
| १२ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०० | ०१ |
| १३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | ०१ |
| १४ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | ०१ |
| १५ | बधिरिकरणशास्त्र | ०३ | ०३ |
| १६ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | ०२ |
| १७ | इमर्जन्सी मेडिसीन | ०२ | ०४ |
|  | एकुण | २२ | ३५ |

वरील पदावर नियुक्ती मिळणेसाठी खालील अटींची पुर्तता आवश्यक आहे.

अ) शैक्षणिक अर्हता :- १) सहाय्यक प्राध्यापक पदासाठी संबंधीत विषयात एम.डी./एम.एस./डीएनबी तसेच १ वर्ष वरीष्ठ निवासी पदाचा अनुभव आवश्यक.
(राष्ट्रीय/भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या दि. १६ ऑगस्ट २०२३ च्या गॅझेटनुसार)
२) वरिष्ट निवासी पदासाठी राष्ट्रीय/भारतीय आयुर्विज्ञान परिषद मान्यता प्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयाची पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस./डी.एन.बी.) असणे आवश्यक आहे.

ब) वयोमर्यादा (सहाय्यक प्राध्यापक) - खुल्या वर्गासाठी - ३८ वर्ष (मुलाखतीच्या दिवशी)
मागासवर्गीयासाठी - ४३ वर्ष (मुलाखतीच्या दिवशी)

क) सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एकत्रित ठोक मासिक मानधन:- १,००,०००/- वरीष्ठ निवासी पदासाठी एकत्रित ठोक मासिक मानधन ९५०००/- (शा. नि. क्र. वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२ दि. ३१.१२.२०२० नुसार अनुज्ञेय.)

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

०१) प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष,तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व पदव्युत्तर परीक्षा गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र, इंटर्नशिप कम्प्लीशन प्रमाणपत्र.
०२) मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिकाऱ्यांचे जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
०३) जन्म तारखेकरीता जन्म तारखेचा दाखला/अथवा शालांत परीक्षेचा दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
०४) आधार कार्ड व पॅन कार्ड

०५) विमुक्त जाती, भटक्या जमाती-१, भटक्या जमाती-२, भटक्या जमाती-३, व इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय, उमेदवारांना प्रगट उन्नत गट-अ मध्ये मोडत नसल्याने (नॉन क्रिमिलियर) सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

०६) एच.एस.सी.प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

०७) अर्ज हा संबंधीत उमेदवाराने स्वत: कार्यालयास येऊन सादर करावा, याची नोंद घ्यावी.

०८) पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याची नोंद, उमेदवाराच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलच्या/इंडियन मेडिकल कौन्सीलच्या नोंदणी प्रमाणपत्र व रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

०९) अनुभवाचे प्रमाणपत्र.

वरील जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा. अटी/नियम/शर्ती/आरक्षण/पदसंख्या इत्यादी मध्ये केंव्हाही बदल करण्याचे तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे तसेच निवड मंडळामार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा सदर जाहिरात रद्द करण्याबाबतचे अंतिम अधिकार अधिष्ठाता, शा. वै. म. अलिबाग यांना असतील.

वरील सहाय्यक प्राध्यापक पदाचा अर्जाबाबत खालील प्रमाणे विवरण लक्षात ठेवून अर्ज सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज मिळण्याची वेळ | कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून |
| २ | अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक | दि. ११/०३/२०२५ ते २२/०३/२०२५ (सायंकाळी०५.०० वाजेपर्यंत) सुट्टीचे दिवस वगळून |
| ३ | मुलाखतीचा दिनांक | २५/०३/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ४ | मुलाखतीचा ठिकाण | मा. अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग-रायगड यांचे कार्यालय. |

गुणवत्ता यादी ही खालील निकषानुसार बनवण्यात येईल.

१) शायकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.डी.,/एम.एस./डी.एन.बी.उत्तीर्ण.

२) संबंधीत विषयात एम.डी.,/एम.एस.,/डी.एन.बी.चे गुण.

३) इतर खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात एम.डी.,/एम.एस./डी.एन.बी.उत्तीर्ण.

४) राज्याबाहेरील एम.डी.,/एम.एस./डी.एन.बी.उत्तीर्ण.

५) ज्या उमेदवाराचे एम.डी., एम.एस. उत्तीर्ण गुण एक समान असतील तर प्रयत्न प्रमाणपत्रानुसार निकष ठरवण्यात येईल.

या वैद्यकीय महाविद्यालयातील वरील जाहिरातीनुसार अर्हताप्राप्त उमेदवार प्राप्त न झाल्यास सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने पुढील सहा महिन्यापर्यंत दर बुधवारी Walking Interview अर्जाप्रमाणे नियोजित केले जाणार आहेत.

(डॉ. पूर्वा पाटील)
अधिष्ठाता
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड